सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०२३

ठराव क्रमांक :- ४४५

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१७/०२/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.३९१ ते ठराव क्र.४४४ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदर कार्यवृत्तातील ठराव क्र.४४२ ला भारतीय जनता पक्षाच्या सर्व सदस्यांचा विरोध नोंदवून घेणेत यावे. तसेच, ठराव क्र.४२५ मध्ये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी मागणी केलेनुसार कुपवाड प्रभाग क्र.८ मधील कुपवाड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या अपुऱ्या कामांसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत किंवा जिल्हा नियोजन निधीमधून किंवा शासनाच्या अन्य योजनेमधून र.रु.५ कोटी मात्रचा एकत्रित प्रस्ताव मा.महाराष्ट्र शासनाकडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे. या दुरुस्तीसह सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा कायम करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सांघिक

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

भारतीय जनता पार्टीचे पुण्यातील खासदार गिरीश बापट यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दु:खद निधन झाले. ते मुळचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. जनसंघापासून ते राजकारणात उतरले. नगरसेवक पदापासून सुरुवात केली. ते १९९५ पासून सलग पाच वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. राजकीय कारकिर्दीत त्यांनी संघ स्वयंसेवक,कामगार नेता,नगरसेवक,आमदार आणि खासदार अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.संगिता विठ्ठलराव खोत ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.मोहना ठाणेदार

D. Kumavashi
महापौर,

प्रशासनीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ३२७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

मा.महाराष्ट्र शासनाच्या भूषण पुरस्कार वितरण समारंभावेळी उष्माघाताने व चेंगरा चेंगरीने झालेल्या दुर्घटनेतील मरण पावलेल्या नागरिकांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.A. Suryavanshi
महापौर,

अनुमोदक :- श्री.संतोष शिवदास पाटील

प्रशासकीय कार्यवाही.

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४४८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री.जगत प्रकाश नड्डाजी तसेच राष्ट्रीय महामंत्री (संघटन) श्री.बी.एल.संतोषजी यांच्या मार्गदर्शनामध्ये भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य मा.श्री.शेखरजी इनामदार साहेब यांच्या कर्नाटक विधानसभा निवडणूक २०२३ च्या बेळगाव जिल्ह्यातील रायबाग विधान सभेची जबाबदारी देण्यात आलेली आहे. साहेबांच्या पक्षातील एकूण २५ वर्षाचा अनुभव पाहता पक्षाने पुन्हा एकदा मोठी जबाबदारी सोपविली आहे. साहेबांच्या या निवडीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.गीता सुयोग सुतार

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi
महापौर,

अनुमोदक :- सौ.कल्पना कल्लाप्पा कोळेकर

प्रभारी उपायुक्त

महानगरपालिका लिपिक
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४०९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

जनसुराज्य शक्ती पक्षाचे युवा प्रदेश अध्यक्ष समीत दादा कदम यांनी मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसो,मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीससो, सांगली जिल्हा पालक मंत्री नामदार सुरेश भाऊ खाडेसो, मा.आमदार सुधीरदादा गाडगीळसो, जनसुराज्य शक्ती पक्षा संस्थापक आमदार विनय कोरे सावकार तसेच, मा.शेखर इनामदार साहेब यांचे सहकार्याने सांगली जिल्ह्यात एकूण ४० कोटी रुपये विकास निधी मंजूर करुन आणला. त्यांच्या या अथक प्रयत्नातून मा.महाराष्ट्र शासन स्तरावर जिल्ह्याला विकास निधी प्राप्त करुन दिला त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.गीता सुयोग सुतार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.उर्मिला उदय बेलवलकर

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नाट्य परिषद मध्यवर्तीच्या पंचवार्षिक निवडणूकीत सांगली जिल्हातून सर्वाधिक मतांनी श्री.मुकुंद पटवर्धन निवडून आले. सांगलीतून सलग दुसऱ्यांदा नियामक मंडळ सदस्य, मध्यवर्ती मुंबई म्हणून निवडून आलेली पहिली व्यक्ती हा मान मिळाला आहे. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.उर्मिला उदय बेलवलकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.गितांजली सुर्यवंशी (ढोपे पाटील)

D. Suryavanshi
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या घरपट्टी विभागाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये डिमांड असलेल्या ११० कोटी पैकी ६०.५० कोटी व उपयोगीता कराच्या ३६ कोटी पैकी १०.४२ कोटी असे एकूण ७.९२ कोटी वसुल केली. महानगरपालिका क्षेत्रात ही वसुली करण्यासाठी अथक परिश्रम घेणारे अधिकारी,कर्मचारी यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश शामराव मुळके

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सोमवार दि.१७/०४/२०२३ रोजी रात्री ९.०० वाजता टिंबर एरिया, सांगली मधील संपती इंडस्ट्रीज या हळद तयार करणाऱ्या कारखान्यामध्ये अचानकपणे आग लागली होती. याची वर्दी प्राप्त होताच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी आपल्या टीमसह सत्वर घटनास्थळी ५ फायर फायटर वाहनासह पोहचून एकूण १० खेपा पाण्याचा मारा करुन आगीवर नियंत्रण मिळविलेबद्दल अग्निशमन दल टीमचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश शामराव मुळके ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले महापौर,

सहाय्यक आयुक्त
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरोग उच्चाटनात राष्ट्रीय पातळीवर सांगली जिल्हा ग्रामीण व सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेला कास्य पदक मिळाले. महानगरपालिका क्षेत्रात क्षयरोग उच्चाटनासाठी प्रभावीपणे काम केलेबद्दल महानगरपालिकेच्या क्षयरोग अधिकारी डॉ.मंजुषा दोरकर व त्यांच्या संपुर्ण टीमचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.संगिता अभिजीत हारगे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.वर्षा अमर निंबाळकर महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्रात उत्सुकता लागून राहिलेली पहिला महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे सांगली मिरज रस्त्यावरील जिल्हा क्रिडा संकुलामध्ये महिला महाराष्ट्र केसरी पदकाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये सांगली जिल्ह्यातील तुंग गावची कन्या प्रतीक्षा बागडी हीने बाजी मारुन पहिली महाराष्ट्र केसरी व चांदीची गदा पटकाविण्याचा मान मिळविल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा तिचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.संगिता विठ्ठलराव खोत ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.गीता सुयोग सुतार

D Sutar
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०२३

ठराव क्रमांक :- ४५५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन कार्वे एमआयडीसी (विटा) च्या अध्यक्षपदी रविंद्र बेंडखळे, सचिव पदी राहूल ढोपे-पाटील यांची निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.अस्मिता संदीप सलगर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.उर्मिला उदय बेलवलकरचच

महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५६

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका वॉर्ड क्र.१९ सांगली स्टेट बँक,विश्रामबाग शाखा ते पुढे पुर्वेला जाणारा खरे पार्किंग पर्यतच्या रस्त्याला निर्भय दत्त मंदिर रोड असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश मुळके. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते

महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५७

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील पोरेज टीव्हीएस शोरुम ते शासकीय विश्रमागृह-पाटीदार भवन नंदादीप आय हॉस्पिटल-महसुल भवन सर्किट हाऊस आयुक्त निवास ते न्यु प्राईड मल्टिप्लेक्स ते बायपास रोड या मार्गास थोर समाजसुधारक सदगुरु श्री.वामनराव पै मार्ग असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.प्रकाश मुळके ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते D.P.Suryavanshi महापौर,

सहा.आयुक्त

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५८

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली पद्माळे रोड (पद्माळ फाटा) येथील महानगरपालिका हद्दीतील स.नं.३१ ब/२ या द्वोत्रातील रहिवाशी भागास लक्ष्मी कॉलनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.सोऽनी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.प्रकाश मुळके

D.P.Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४५९

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१७ मधील दिलीप टायर्स ते १०० फुटी रोड पर्यंतच्या रस्त्यास निसर्ग प्रेमी शिवाजी ओऊळकर मार्ग असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.रोजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.प्रकाश सुर्वे D.P.Suryavanshi महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६०

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली फौजदार गल्ली परिसरातील पै.जोतीरामदादा पाटील सावर्डेकर मार्गाच्या दुतर्फा असणाऱ्या गल्ल्यांना फौजदार गल्ली क्र.१ ते ६ असे क्रमांक देणे असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.रोहिणी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.प्रकाश मुळके

D.P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६१

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग, सांगली) यांचे दि.०९/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजनेतर्गत मंजूर र.रु.२ कोटी मधील खाली नमुद केलेल्या ०६ कामांचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेस सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम रुपये
१.	कुपवाड वॉर्ड क्र.१ इंदिरानगर मधील अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे.	३०,००,०००/-
२.	कुपवाड वॉर्ड क्र.१ प्रकाशनगर येथील बाबू मुल्ला घर ते १०० फुटी रोड पर्यंतचा रस्ता काँक्रिटीकरण करणे.	३०,००,०००/-
३.	कुपवाड वॉर्ड क्र.१ रामकृष्णनगर मधील पाटील मळा येथील अंतर्गत रस्ते करणे.	३०,००,०००/-
४.	कुपवाड वॉर्ड क्र.१ एस.टी. कॉलनी मधील अंतर्गत रस्ते व गटार करणे.	४०,००,०००/-
५.	कुपवाड वॉर्ड क्र.१ आंबा चौक परिसरातील अंतर्गत रस्ते करणे.	३०,००,०००/-
६.	कुपवाड वॉर्ड क्र.१ कुपवाड बुधगाव रस्ता अजिंक्यनगर मधील अंतर्गत रस्ते करणे.	४०,००,०००/-

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा. सदस्य श्री. शेडजी सुबराव मोहिते यांची उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेऊन ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१०० (११) नवि-१६ दि.३०/०३/२०२२ ने महापालिकेस र.रु. ५ कोटी इतके अनुदान मंजूर झाले असून त्यामधून शासन निर्णयात नमुद केलेले अनु.क्र.१ ते ३५ कामे मंजूर झालेली आहेत. सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असून सदरच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत असून सदरकामी महानगरपालिकेचा २५% प्रमाणे हिस्सा १५ व्या वित्त आयोगातून खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा. सदस्या सौ. पद्मश्री प्रशांत पाटील यांची उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेऊन ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.-रस्ताअ-२०२२/प्र.क्र.४२२-ब-३१ (१) नवि-१६ दि.२४/०३/२०२३ अन्वये सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस विशेष रस्ता अनुदान म्हणून र.रु.८,८०,००,०००/- मात्रचा निधी मंजूर झालेला असून त्यामध्ये शासन निर्णयात नमुद करण्यात आलेली अनु.क्र.१ ते ४२ कामे मंजूर झालेली आहेत. सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असून सदरच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.-मनपा-२०२२/प्र.क्र.४२२-ब-३१ नवि-१६ दि.२४/०३/२०२३ अन्वये महापालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधाच्या विकासासाठी र.रु.१,२०,००,०००/- मात्रचा निधी मंजूर झालेला असून त्यामधून सदर शासन निर्णयात नमुद करण्यात आलेली अनु.क्र.१ ते ८ कामे मंजूर झालेली आहेत. सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असून सदरच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

D. A. Suryavanshi

अनुमोदक :- सौ पद्मश्री पाटील महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६२

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,मिरज) यांचे दि.३१/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम मधील पुर्वेकडील रस्त्यालगत असणारे जुनी पॅव्हेलिअन इमारत,रिटेनिंग वॉलचे विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत होत असलेले बांधकाम पाडणे तसेच नविन पॅव्हेलिअन रिटेनिंग बांधकाम करणेस ही सभा मान्यता देत असून, तोपर्यत सुरक्षिततेच्या दृष्टीने त्या ठिकाणी पत्रे मारुन देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे र.रु.४,८८,५००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सभागृहामध्ये सन्मा.सदस्य श्री.आनंदा देवमाने यांची मागणी केलेनुसार प्रस्तुत ठिकाणची नविन भिंत बांधून पुर्ण झालेनंतरच जूनी भिंत पाडणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६३

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (बालमंदिर विभाग) यांचे दि.०९/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या बालमंदिर हिराबाग वॉटर वर्क्स येथील जुन्या शाळेची इमारत पाडून त्या ठिकाणी बालमंदिरच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नविन हॉल बांधणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेउनी मोहिते D.P. Suryavanshi, महापौर,

मुख्याध्यापिका
बालमंदिर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६४

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२०/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४ दि.२९/०९/२०१८ या शासन निर्णयान्वये दि.०१/११/२००५ रोजी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती योजनेचा सदस्य असणारा कर्मचारी १० वर्ष सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू पावल्यास त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केलेले नसल्यास त्याचे कायदेशिर वारसास सानुग्रह अनुदान र.रु.१० लक्ष अधिक कर्मचाऱ्याचे खाती जमा असलेले संचित रक्कम देणेत यावी असा शासन निर्णय झालेला असून, सदर शासन निर्णयाप्रमाणे पात्र असणाऱ्या महापालिकेच्या सर्व कर्मचारी यांना लाभ देणेची अंमलबजावणी करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

D. P. Sujavarshi

महापौर,

प्रशा. अधि. (आस्था)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६५

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.१६/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२ अंतर्गत CSMC ची बैठक क्र.४३ दि.२५/०२/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये घटक क्र.३ मधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांकरीता परवडणाऱ्या घरांची निर्मिती (AHP) अंतर्गत २८८ सदनिकांच्या मंजुर प्रकल्पाची जागा ब्लु झोन मध्ये येत असल्याने व सदर प्रकल्पाकरीता पर्यायी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे प्रकल्प रद्द करणेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी प्रशासनाने प्रस्ताव सादर केला असून, सदर घरकुल प्रस्ताव रद्द न करता, महापालिका क्षेत्रातील घरकुल योजनेसाठी आरक्षित असलेल्या जागेवर अथवा इतर खुल्या भुखंडावर असलेल्या आरक्षणामध्ये फेरबदल करुन त्या जागेवर सदरचा प्रकल्प स्थलांतरीत करणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी प्रशासनाने आवश्यक ती पुर्तता करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [illegible] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [illegible] महापौर,

[illegible]

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६६

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.२१/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.केंद्र शासन मोटार वाहन (निष्कासन व नोंदणी) नियम २०२१ प्रसिद्ध केले असून तद्अनुषंगाने धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करणेत आलेली आहेत व याबाबत राज्यातील शासकीय,निमशासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक परिवहन उपक्रम याचे अधिनस्त कार्यालयातील १५ वर्षा पेक्षा जास्त वय असणारे वाहने निष्काषित करणेबाबत शासन आदेश निर्गमित झाले आहेत. त्यानुसार महापालिकेकडील ६८ वहाने दि.०३ एप्रिल २०२३ पासून बंद ठेवावी लागणार असून, सदरची वाहने शासन नियमानुसार निष्काषित करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ह.नि. संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- ह.नि. धोंडीजी मोहिते. D.f. Suryavanshi
महापौर,

उप. इंजि. (कार्यशाळा)

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६७

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२७/०२/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.शासन निर्णय सा. न्या. व. वि. स. विभाग. विभाग क्र.संकिण / २०२० / प्र.क्र.३३ / अजाक, दि.११/१२/२०२० अन्वये महापालिका क्षेत्रातील गावांची वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून अशा नावां ऐवजी महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडीत नावे देणेबाबत शासन निर्गमित झालेले असून, सदर मा.शासन निर्णयानुसार महापालिकेने आठ सदस्यांची समिती गठीत केलेली होती. सदर समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महापालिका क्षेत्रातील रस्ते यांची जातीवाचक नावे बदलून अशा नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडीत नावे देणेच्या प्रस्तावास ही सभा सहमती दर्शवित असून, खाली नमुद केलेप्रमाणे महापालिका क्षेत्रातील वस्त्यांची /रस्त्यांची नावे बदलून नविन नाव देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

प्रभाग समिती क्रं. १								
अ.क्रं.	क्षेत्र	गावाचे / वस्तीचे/ रस्त्याचे पूर्वीचे नांव						
	सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिका	गावाचे नांव	वस्तीचे नांव	रस्त्याचे नांव	शासन निर्णयानुसार नवीन दिलेले नांव	नाव बदल केल्याचा दिनांक	नावात बदल केला नसलेस त्याची कारणे	शेरा
१	२	३			४	५	६	७
१	वॉर्ड क्रं. ११	निरंक	गोसावी गल्ली		लक्ष्मी नगर			
			रामरहिम कॉलनी		रामरहिम कॉलनी			
			साठेनगर		साठेनगर			
			मांगवाडा		चिंतामणीनगर			
			पाटणे प्लॉट		पाटणे प्लॉट			
२	वॉर्ड क्रं. १२	निरंक	लोणी गल्ली	पटेल चौक				
			खाटीक गल्ली					
			फकीर गल्ली		जामवाडी			
			बुरुड गल्ली		पै. व्यंकाप्पा बुरुड गल्ली			
			गोसावी गल्ली		लक्ष्मी नगर			
			गवळी गल्ली		गोपाळकृष्ण गल्ली			
			भिसाडे गल्ली					
			माळी गल्ली		सावंत माळी गल्ली			
			डवरी गल्ली		वाल्मिकी आवास			
			जैन बस्ती		महावीर नगर			
			धोबी घाट		धोबी घाट			
३	वॉर्ड क्रं. १३	निरंक	धनगर गल्ली	निरंक	बाळू मामा मंदीर गल्ली			
			मुलाणी गल्ली					
			कोळीवाडा					
			कुंभार गल्ली		लक्ष्मण कुंभार गल्ली			
			सुतार प्लॉट					
			पठाण वाडा (गल्ली)		हनुमान चौक गल्ली			
			जामदार गल्ली		जामदार गल्ली			
			कासार बोळ		कालिका बोळ			
४	वॉर्ड क्रं. १४	निरंक	बुरुड गल्ली	बुरुड गल्ली	पै. व्यंकाप्पा बुरुड गल्ली			
			गवळी गल्ली					
			रजपूत बोळ		रजपूत बोळ			
			गुजर बोळ		पेठभाग			
			महात गल्ली		नेताजी सुभाषचंद्र बोस			
			सोनार गल्ली		सराफ कट्टा			
			कैकाडे गल्ली					
			जैन बस्ती		पाटील गल्ली, गावभाग			
			ढोर वाडा		रोहिदास गल्ली			
			कुंभार खिंड		टिळक चौक			
			शिकलगार गल्ली		त्रिमूर्ती चौक, गावभाग			

५	वॉर्ड क्रं. १६	निरंक	मद्रासी गल्ली	सय्यद	आण्णाभाऊ साठे नगर			
			भूई गल्ली	अमीन रोड	खणभाग			
			धनगर गल्ली		संत बाळूमामा गल्ली			
			गोसावी गल्ली	हिंद् मुस्लिम चौक	लक्ष्मीनगर			
	एकूण :-		३९	४				

प्रभाग समिती क्रं. २

अ.क्रं.	क्षेत्र	आपल्या क्षेत्रातील जातीवाचक			शासन निर्णयानुसार नवीन दिलेले नांव	नाव बदल केल्याचा दिनांक	नावात बदल केला नसलेस त्याची कारणे	शेरा
	सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.	गावाचे नांव	वस्तीचे नांव	रस्त्याचे नांव				
१	२	३			४	५	६	७
१	वॉर्ड क्रं. १०	निरंक	वडर गल्ली	निरंक	बाल हनुमान कॉलनी			
					सर्वोदय कॉलनी			
					न्यू सर्वोदय कॉलनी			
					अष्टविनायक नगर			
२	वॉर्ड क्रं. १५	निरंक	निरंक	निरंक				
३	वॉर्ड क्रं. १७	निरंक	धनगर गल्ली	निरंक				
४	वॉर्ड क्रं. १८	निरंक	निरंक	निरंक				
५	वॉर्ड क्रं. १९ (जवाहर झोपडपट्टी)	निरंक	मद्रासी गल्ली	निरंक	संत वाल्मिकी गल्ली			
६	वॉर्ड क्रं. १९ (गडदे गल्ली)	निरंक	धनगर गल्ली	निरंक	संत बाळूमामा गल्ली			
७	वॉर्ड क्रं. १९ (रेणुका मंदीर लाईन)	निरंक	धनगर गल्ली	निरंक	संत बाळूमामा गल्ली			
८	वॉर्ड क्रं. १९ (बेथेलहेम नगर)	निरंक	ख्रिश्चन समाज	निरंक	संत मदर तेरेसा			
	एकूण :-	०	६	०				

प्रभाग समिती क्रं. ३

अ.क्रं.	क्षेत्र	आपल्या क्षेत्रातील जातीवाचक			शासन निर्णयानुसार नवीन दिलेले नांव	नाव बदल केल्याचा दिनांक	नावात बदल केला नसलेस त्याची कारणे	शेरा
	सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.	गावाचे नांव	वस्तीचे नांव	रस्त्याचे नांव				
१	२	३			४	५	६	७
१	वॉर्ड क्रं. १	निरंक	निरंक	निरंक				
२	वॉर्ड क्रं. २	निरंक	निरंक	धनगर गल्ली	पै. धोंडिराम हाक्के			
				माळी गल्ली	स्वातंत्र सेनानी धोंडीराम बापू माळी			
				लिंगायत गल्ली	कै. श्रीमती लक्ष्मीबाई बाबगोंडा पाटील रुमाले	२०/१०/२०२१	–	
				जैन गल्ली	देशभक्त आर.पी.पाटील आण्णा मार्ग			
				चांभार गल्ली	संत रोहिदास महाराज मार्ग			
				ताराळ गल्ली				
३	वॉर्ड क्रं. ८	निरंक	निरंक	निरंक				
४	वॉर्ड क्रं. ९	निरंक	निरंक	माळी गल्ली	गजानन कॉलनी			
	एकूण :-	०	०	७				

प्रभाग समिती क्रं. ४								
अ.क्र.	क्षेत्र	आपल्या क्षेत्रातील जातीवाचक						शेरा
	सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.	गावाचे नांव	वस्तीचे नांव	रस्त्याचे नांव	शासन निर्णयानुसार नवीन दिलेले नांव	नाव बदल केल्याचा दिनांक	नावात बदल केला नसलेस त्याची कारणे	
१	२	३			४	५	६	७
१	वॉर्ड क्रं. ३	मिरज	मंगळवार पेठ माळी गल्ली	निरंक	फुलेनगर			
२	वॉर्ड क्रं. ३	मिरज	मंगळवार पेठ परिट गल्ली	निरंक	संत गाडेबाबा गल्ली			
३	वॉर्ड क्रं. ३	मिरज	मंगळवार पेठ, कुंकवाले गल्ली	निरंक				
४	वॉर्ड क्रं. ४	मिरज	ब्राम्हणपुरी	निरंक	लोकमान्य टिळक			
५	वॉर्ड क्रं. ५	मिरज	लोणार गल्ली	निरंक	सुभाषचंद्र बोस			
६	वॉर्ड क्रं. ६	मिरज	धनगर गल्ली	निरंक	माता अहिल्यादेवी होळकर गल्ली			
७	वॉर्ड क्रं. ६	मिरज	ढोर गल्ली	निरंक	संत चोखा मेळा			
८	वॉर्ड क्रं. ६	मिरज	लिंगायत गल्ली	निरंक	संत बसवेश्वर			
९	वॉर्ड क्रं. ६	मिरज	मुस्लिम गल्ली	निरंक	डॉ अब्दुल कलाम			
१०	वॉर्ड क्रं. ६	मिरज	बुरुड गल्ली	निरंक				
११	वॉर्ड क्रं. ६	मिरज	घिसाडी गल्ली	निरंक	राणा प्रताप			
१२	वॉर्ड क्रं. ७	मिरज	कैकाडी गल्ली	निरंक	कैकाडी महाराज			
१३	वॉर्ड क्रं. ७	मिरज	कुंभार गल्ली	निरंक	संत गोरा कुंभार			
१४	वॉर्ड क्रं. ७	मिरज	धनगर गल्ली	निरंक	मल्हारराव होळकर			
१५	वॉर्ड क्रं. ७	मिरज	माळी गल्ली	निरंक	संत सावंत माळी			
१६	वॉर्ड क्रं. ७	मिरज	गोंधळी गल्ली	निरंक	जोतीबा गल्ली			
१७	वॉर्ड क्रं. २०	मिरज	गोसावी गल्ली	निरंक	लक्ष्मीनगर			
१८	वॉर्ड क्रं. २०	मिरज	पारधी वसाहत	निरंक	डॉ.बाबासाहेब आंबेडकर			
१९	वॉर्ड क्रं. २०	मिरज	माळी गल्ली	निरंक	संत बाळू मामा			
२०	वॉर्ड क्रं. २०	मिरज	लोहार गल्ली	निरंक	राणा प्रताप			
	एकूण :-	०	२१	०				

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.प्रकाश शामराव मुळके यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१० मधील वांगीकर प्लॉट येथील मनपा मालकीच्या स.नं.२९६/२अ मध्ये माकडवाले कोंची कोरवी समाजाचे प्रशस्त सभागृह बांधणेची कामगिरी सुरु असून, या सभागृहास माकडवाले कुंची कोरवी असे समाजाचे नाव देण्यात आलेले आहे. या सभागृहास जातीवाचक नांव असलेने प्रभागातील समाज बांधवांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. याभागातून सलग तीन वेळा पंचवार्षिक निवडणूक लढवून विजयी झालेले व प्रभागातून तसेच समाजातून सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले स्वर्गीय शामराव रामचंद्र मुळके यांचे नाव या सभागृहास देणेसाठी परिसरातील नागरिकांचेकडून व समाज बांधवांकडून मागणी होत असल्याने, सदर सभागृहाचे जातीवाचक नाव बदलून माजी नगरसवेक- माजी सभापती स्वर्गीय शामराव रामचंद्र मुळके सामाजिक सभागृह असे नामकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६८

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२४/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील एक महिन्यापेक्षा जास्त काळ नादुरुस्त असलेल्या पाणी मिटर धारकांना मिटर दुरुस्त करुन, सुव्यवस्थेत आणेपर्यत किमान आकारणी अथवा मिटर सुव्यवस्थीत असतानाची आकारणी याच्या दुप्पट दराने पाणी पट्टी आकारणी करणेचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत असून, नविन बांधकामासाठी बिगर घरगुती दराने कनेक्शन घेणाऱ्या ग्राहकांना बांधकाम प्रतिपुर्ती प्रमाणपत्र दिनांकापासून अथवा घरपट्टी लागू केलेल्या दिनांकापासून घरगुती दराने पाणी बील आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. D.P. Suryavanshi महापौर,

पाणीपुरवठा अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४६९

विषय क्रमांक :- १७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

कुपवाड स.नं.१६३ (जुना २११) मधील इकडून अंतिम मंजूरी देणेत आलेल्या श्री.शरद रामगोंडा पाटील यांची मिळकती मधील रेखांकनामधील ३०.४८ मी. रुंदीच्या नियोजीत विकास योजना रस्त्याचे बाधित होणाऱ्या क्षेत्रापैकी ९.० मी.रुंदीचा अपेक्षीत पोहोच रस्ता व या कार्यालया मार्फत नाल्याच्या बांधकामासाठी संपादित करण्यात आलेली ५.० मी रुंदीची पट्टी सोडून उर्वरित १७७१.०२ चौ.मी.क्षेत्र जागाची चालू शासकीय रेडिरेकनर दराने होणारी नुकसान भरपाईची रक्कम महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार देवून, खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत असून, याकामी मा.आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वॉर्ड क्र.८ मधील जुना स.नं.२१९/१+२२०/३+२२१/२ नविन स.नं.१७१/१+२२०/३ +२२१/२ मधील डीपी आरक्षीत ३०.५० मी. चे क्षेत्र ३९९५ चौ.मी. व डी.पी रस्ता १२.४० मी.चे क्षेत्र ३७९.३५ चौ.मी. असे एकूण ४३७४.३५ चौ.मी. क्षेत्र हे श्री.मलगोंडा रामगोंडा पाटील, सुनिता शांतगोंडा पाटील, संदीप शांतगोंडा पाटील,कुलभूषण शांतगोंडा पाटील, अर्चना बाबासो पाटील,ज्योती अभिषेक पाटील यांचे नावे असून, त्यांनी सदर जागेचे भूसंपादन करणेबाबत लेखी मागणी केलेली असून, सदर जागेची रेडीरेकनर नुसार अंदाजे र.रु.४२५ लक्ष होत आहे. सदरचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीने आणखी किती रक्कम कमी करता येईल ते पाहून, मा.आयुक्त यांनी जागेचे भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या मिरज शहरातील स.नं.१/अ/१/अ मधील श्री.दर्शनसिंग गुरुमुखसिंग चड्ढा व गुरुविंरदसिंग कुलतारसिंग चड्ढा, किरणदिप कुलतारसिंग चड्ढा, कलदिपसिंग गुरुमुखसिंग चड्ढा यांच्या तर्फे वटमुखत्यारधारक यांची वडिलोर्पाजित १२० गुठें जमिन असून, त्यापैकी ७८५५ चौ.मी. क्षेत्र हे किंडांगण आरक्षणाने बाधीत होत आहे. तथापि, सदर आरक्षित जमिनीपैकी ४४०५ चौ.मी. क्षेत्रावर सन २००० पुर्वी पासून गुंठेवारी होवून, तेथील नागरिकांना महापालिकेच्या वतीने रस्ते पाणी सारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेल्या असून, त्यांना घरपट्टीही लागू करणेत आलेली आहे. त्यामुळे सदर जागेवरील आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील १९६६ मधील कलम ३७ अन्वये आरक्षणात बदल करुन सदर ४४०५ चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मा.शासन मान्यतेस पाठविणेस व गुंठेवारी अधिनियमातील कलम ५ (१), ५(२) नुसार मा.शासन मान्यतेच्या अधीन राहून गुंठेवारी प्रमाणपत्र देणेस ही सभा मान्यता देत असून, सदर आरक्षणातील उर्वरित ३४५०.चौ.मी. क्रिडांगण आरक्षण व १५५० चौ.मी. डी.पी.रस्त्या खालील आरक्षीत अशा दोन्ही जमिनींचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीने संपादीत करणेस मा.आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- सौ.संगिता खोत

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ **दिनांक :- २०/०४/२०२३**

ठराव क्रमांक :- ४७०

विषय क्रमांक :- १८

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.३०/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.०३ मध्ये लहान मुलांसाठी बालोद्यान विकसीत करणेसाठी परिसरातील लोकांची मागणी होत असून, मिरज येथील जुना स.नं.६,७अ/१८१/१८२ या रेखांकनामधील भुखंड क्रमांक २०२० क्षेत्र ३०३.९० चौ.मी.ही मिळकत श्री.किशोर पटवर्धन यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीच्या क्षेत्राचा व मुख्य रस्त्यालगतच्या भौगोलिक परिस्थितीचा व संलग्नतेचा विचार करता, सदर मिळकतीच्या लगत असलेले प्लॉट नं.२२० या जवळचा क्षेत्र ३०३.२० चौ.मी.ही मिळकत महापालिकेच्या ताब्यात असलेले भूखंड क्रमांक २१९ ला अदलाबदल करुन देणेकामी मागणी केलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या विद्यमान मालकीच्या भूखंड क्रमांक २१९ क्षेत्र १९६५.५२ चौ.मी.व श्री.पटवर्धन यांच्या मालकीच्या भूखंड क्रमांक २२० क्षेत्र ३०३.२० चौ.मी.असे एकत्रितपणे २२६८.७२ चौ.मी.अशा मोठ्या व सलग क्षेत्रावर बालोद्यान विकसीत होणार असल्यास सदरचा प्लॉट क्षेत्र अदलाबदल करुन महानगरपालिकेस हस्तांतरण करणेबाबत श्री.पटर्वधन यांना विचारणा केली असता, महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड क्रमांक २०१ ब मध्ये उत्तर पुर्व कोप-यात समान क्षेत्र अंतर विभाजन करुन दिलेस भूखंड क्रमांक २२० महानगरपालिकेकडे मालकीने हस्तांतरीत करणेस तयार असलेबाबत दि.१०/०२/२०२२ रोजी पत्र दिले आहे.

प्रस्तुत कामी मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडील जा.क्र.टिपीएस-२०१४/१५१८ प्र.क्र.९४/१४/नवि-१३ दि.०१/१०/२०१५ रोजीचे पत्रानव्ये अस्तित्वातील सार्वजनिक / निमसार्वजनिक वापर केमरुन स्कूल क्षेत्र ३००.०० चौ.मी.सदर आरक्षण नसल्याने त्यास खरेदी सूचना लागू होत नाही त्यामुळे सदर जागेचा टि.डी.आर.मिळावा ही अर्जदार श्री.पटवर्धन यांची विनंती अमान्य करण्यात येत असलेचे नमुद केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ मधील तरतुदीनुसार मा.आयुक्तसो यांचे अधिकारात अदलाबदल करणे योग्य होणार असलेने, मा.आयुक्तसो यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता, त्यास मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिलेनुसार विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान. ठराव बहुमताने मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.निरंजन आवटी.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका